लोकमत

# पैसा हा मोठेपणाचा मार्ग नाही - सुरेश प्रभू एम्को फाउंडेशनचा बक्षीस वितरण समारंभ

(29-02-2012 : 03:56:08) Share

ठाणे । दि. २८ (प्रतिनिधी)

पैसा हा मोठेपणाचा मार्ग नाही, प्रत्येकाने प्रयत्न करावा. त्यामुळे कोणतीही गोष्ट अशक्य नाही, असा मोलाचा सल्ला माजी ऊर्जामंत्री सुरेश प्रभू यांनी ठाण्यात एम्को फाउंडेशनच्या कार्यक्रमात उपस्थित बच्चेकंपनीला दिला एम्को फाउंडेशन ही संस्था शैक्षणिक, आरोग्य आणि पर्यावरण क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेतर्फे ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रभू यांच्या हस्ते वादविवाद स्पर्धेतील विद्यार्थ्यांबरोबर या वर्षीच्या सवरेत्कृष्ट विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी एम्को फाउंडेशनचे विश्वास्त राजेश जैन आणि रामास्वामी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रभू यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हातात नसलेल्या गोष्टी जीवन घडवीत असते, तसेच अंतर्मनाचे ऐकण्यास सुरुवात करा, महत्त्वाकांक्षा मोठी असावी, असे शेवटी त्यांनी सांगितले.

एम्को फाउंडेशन ही संस्था ठाणे आणि जळगाव महापालिके च्या तसेच महाराणा प्रताप हायस्कूलमधील मुलांना व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे देत आहेत. परिवर्तन प्रोजेक्ट नावाने सुरू असलेल्या कार्यक्रमात महापालिकेच्या शाळेतील गरीब मुलांना संवाद कौशल्य, ध्येयनिश्चिन्ती, सकारात्मक दृष्टी, वादविवाद आदी विषयांवर शाळेच्या वेळेत त्यांच्या कलागुणांना वाव देत आहेत.

ठाण्यातील १३ शाळेतील ८ ते १0 वीच्या विद्यार्थ्यांना संस्थेचे १४ प्रशिक्षक प्रशिक्षण देत आहेत. मागील चार वर्षांत ही संस्था ५ हजार मुलांपर्यंत पोहोचली आहे. १0 वीच्या प्रत्येकी १0 गरीब मुला-मुलींना ५ हजारांची शिष्यवृत्ती देत त्यांच्या पुढील शिक्षणाचा खर्च उचलत आहे.